(मा. राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. रानिआ/जिपपंस-२०२५ प्र.क्र. २९/का.७ दिनांक ०१/१०/२०२५ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र)

**परिशिष्ट-९ (ब)**

**पंचायत समिती प्रारूप आरक्षणाबाबतची अधिसूचना**

क्रमांक-2025/सा.प्र./जिपपंसनि/प्र.क्र.16, ज्याअर्थी; राज्य शासना कडील क्रमांक-जिपनी-2025/ प्र.क्र.36/पं.रा.2 **दिनांक 12/06/2025 व 18/06/2025** रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार पालम पंचायात समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीकरिता 08 गणांच्या भौगोलिक सिमा **क्र.2025/सा.प्र./जिपपसंनि/प्र.क्र.2 दि.22/08/2025** च्या अधिसूचनेन्वये शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, 1961 मधील तरतुदी अन्वये आणि राज्य निवडणूक आयोगाकडील **क्र.रानिआ/जिपपंसनि-2025/प्र.क्र.29/का-7,दिनांक 01/10/2025** रोजीच्या आदेशान्वये पालम पंचायत समितीमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रीयांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व स्त्रीयांसह) राखुन ठेवावयाच्या जागा निश्चित केल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग कडील **क्र.रानिआ/जिपपंस-2025/प्र.क्र.29/का-7, दिनांक 01/10/2025** रोजीच्या आदेशान्वये आरक्षण सोडत काढुन त्याची सोडती व्दारे काढण्यात आलेल्या आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचे अधिकार संबंधित तहसिलदार यांना प्रदान केले असुन सदर आदेशान्वये दिलेल्या कार्यक्रमानुसार पालम पंचायत समितीमधील आरक्षित निर्वाचक गणांची जाहीर सोडत दिनांक 13/10/2025 रोजी काढण्यात आली. सदर सोडतीनंतर निश्चित झालेले निर्वाचक गणनिहाय आरक्षणाची प्रारुप अधिसूचना याव्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

आणि त्याअर्थी, सदर प्रारुप आरक्षणाची अधिसूचना पालम पंचायत समिती क्षेत्रातील सर्व रहिवाश्यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत असुन सूचना देण्यात येत आहेत की, सदर प्रारुप आरक्षण अधिसूचनेस, ज्या लोकांच्या काही हरकती असतील, त्यांनी त्या जिल्हाधिकारी परभणी / तहसिलदार पालम यांच्याकडे दि. 17/10/2025 पर्यंत सादर कराव्यात. सदर तारखेनंतर आलेल्या हरकती विचारात घेण्यात येणार नाही.

**पालम पंचायत समितीमधील एकुण जागांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | एकुण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | 01 | 01 |
| २. | अनुसूचित जमाती | 00 | 00 |
| ३. | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग | 02 | 01 |
| ४. | सर्वसाधारण | 05 | 02 |
| | **एकुण** | **08** | **04** |



Scanned with OKEN Scanner

## पालम पंचायत समितीमधील निर्वाचक गण निहाय आरक्षणाचा तपशील

| अ.क्र. | तालुका | निवडणूक विभाग क्रमांक व नांव | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 01 | पालम | 44 - रावराजुर | 87 - रावराजुर | नागरिकांचा मागास प्रवर्ग |
| | | | 88 - फरकंडा | सर्वसाधारण |
| | | 45 - पेठशिवणी | 89 - पेठशिवणी | सर्वसाधारण (महिला) |
| | | | 90 - पेठपिपंळगाव | अनुसूचित जाती (महिला) |
| | | 46 - चाटोरी | 91 - चाटोरी | नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) |
| | | | 92 - आजमाबाद | सर्वसाधारण (महिला) |
| | | 47 - बनवस | 93 - बनवस | सर्वसाधारण |
| | | | 94 - तांदुळवाडी | सर्वसाधारण |

ठिकाणः- पालम

दिनांकः- 13.10.2025

(उषाकिरण श्रृंगारे)
तहसिलदार पालम

(जीवराज डापकर)
उपविभागीय अधिकारी, गंगाखेड

(संजयसिंह चव्हाण) भा.प्र.से.
जिल्हाधिकारी तथा
जिल्हा निवडणूक अधिकारी परभणी



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner